Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Sukh Bharun sandate
Lyricist: Shanta Shelke

सुख भरून सांडते घरीदारी
सुख भरून सांडते घरीदारी
मज काय उणे या संसारी
मज काय उणे या संसारी

गंगेहून मन निर्मळ प्रेमळ
गंगेहून मन निर्मळ प्रेमळ
सासू नच ही माता केवळ
सासू नच ही माता केवळ
कर वत्सल फिरता पाठीवरी
मज काय उणे या संसारी
मज काय उणे या संसारी

जशी वाऱ्याची झुळूक अनावर
जशी वाऱ्याची झुळूक अनावर
नणंद तैशी गोड खेळकर
नणंद तैशी गोड खेळकर
उतरला स्वर्ग या भूमीवरी
मज काय उणे या संसारी
मज काय उणे या संसारी

पूर्व पुण्य मम ये साकारून
पूर्व पुण्य मम ये साकारून
पती चरणाचे घडले पूजन
पती चरणाचे घडले पूजन
ही जोड मिळावी जन्मभरी
मज काय उणे या संसारी
मज काय उणे या संसारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*